**<u>विशेष दिवाणी दावा क्र.५९/१४</u>**

**<u>निशाणी ५३ खालील आदेश</u>**

१. वादपत्रात नमुद दावा मिळकत १अ ते १इ या मिळकतीमध्ये मेहनत मशागत करण्यासाठी वादी ज्या ज्या वेळी जाईल त्या त्या वेळी पोलीस मदत देण्यात यावी यासाठी वादींतर्फे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १५१ नुसार प्रस्तुतचा अर्ज सादर करण्यात आला आहे.

२. **<u>वादीचे संक्षीप्त कथन खालीलप्रमाणे:—</u>**

वादपत्रात नमुद दावा मिळकत १अ ते १इ यांचेवर वादींचा शांततामय ताबा असून प्रतिवादींनी त्यास कसलाही हरकत अडथळा करू नये असा आदेश तुर्तातुर्त मनाईसाठीचा अर्ज निशाणी ५ ची सुनावणी गुणावगुणावर झाल्यानंतर दि. २१.०३.२०१६ रोजी पारीत करण्यात आला आहे. या आदेशाच्या विरूध्द अपील झाल्याचे किंवा या आदेशास स्थगीती आल्याबाबत वादींना आजवर कसलीही नोटीस आलेली नाही. यापैकी दावा मिळकत १ब व १ ड वर नांगरट करण्यासाठी वादी गेलेले असताना प्रतिवादींनी त्यास या मिळकतीमध्ये काम करण्यास अडथळा केला. तसेच वादींना खोटया फौजदारी कारवायामध्ये गुंतविण्याची त्यांनी धमकी दिली. त्यामुळे वादींना उपरोक्त नमुद मिळकती मध्ये मशागत करणे दुरापास्त झाले आहे. तसेच प्रतिवादींकडुन वादीच्या जिवीतास धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळेच ज्या ज्या वेळी वादी दावा मिळकत १अ ते १इ मध्ये मशागत करण्यासाठी व इतर कामकाज करण्यासाठी जाईल त्यावेळी त्याला पोलीस मदत मिळणे आवश्यक आहे.

त्यासाठी होणारा खर्च भरण्यास वादी तयार आहे. सबब उपरोक्त स्वरूपाची पोलीस मदत मिळावी यासाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. **प्रतिवादीतर्फे निशाणी.६२–अ नुसार म्हणणे खालील प्रमाणे :–**

अर्ज निशाणी ५१ खरा, बरोबर व कायदेशिर नाही आणि त्यातील मजकुर प्रतिवादींना मान्य नाही. प्रस्तुतच्या अर्जास कसलेही कारण घडलेले नव्हते व नाही. निशाणी ५ वर झालेला आदेश हा अंमल बजावणी करण्यासारखा नाही. तसेच वादीने मागितलेली पोलीस मदत देणे ही मागणी चुकीची व बेकायदेशीर आहे. कारण दाव्यात नमुद मिळकती मध्ये प्रतिवादी यांची मालकी, कब्जे वहिवाट होती व आहे. तसेच या अर्जाद्वारे वादी त्यास नसलेले हक्क प्राप्त करू पाहत आहे व सदरच्या आदेशाचे गैरवापर करून प्रतिवादींना त्यांचे मिळकतीतुन हुसकावून लावणेचे गैरकृत्य कय पाहत आहे व प्रतिवादीचे विहीर इलेक्ट्रीक मोटार पाईपलाईनमध्ये नसलेला हक्क निर्माण करणार आहे. त्यामुळे अर्ज रद्द व्हावा.

४. प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला प्रकरणाची वस्तुस्थिती व उपरोक्त युक्तीवाद पाहता मी खालील मुददे निश्चित केले आणि त्यावर माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| मुददे (points) | निष्कर्ष |
|---|---|
| १.अर्ज निशाणी ५३ मंजूर करुन पोलीस मदत मिळण्यास वादी पात्र आहेत का ? | **‘‘नकारार्थी’’** |

| | |
|---|---|
| २ काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र णे मि मां सा</u>

**<u>मुददा क १ साठीः—</u>**

५. वादींचे विद्वान वकील श्री एम.बी. गाजरे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे युक्तिवाद नाही.

६. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादींनी वादींच्या दावामिळकत १अ ते १ई या मिळकतींवरील शांततामय ताब्यास कसलाही हरकत अडथळा करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश वादींच्या हक्कात देण्यात आलेला आहे. प्रस्तुत आदेशाविरूध्द मा. वरिष्ठ न्यायालयामध्ये दि.कि.अ. क्र. ८९/१६ हे किरकोळ अपील प्रलंबित असल्याचे दिसते वादीच्या कथनानुसार त्यांच्या दावा मिळकतीवरील शांततामय ताब्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा केल्यामुळे त्यांना पोलीस मदत देण्यात यावी. वादींचे विद्वान वकील एम.बी. गाजरे यांनी <u>सन्माननीय आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचा रयापती उदेम्मा विरूध्द पोथीनेनी नरसिंम्हम हा ए.आय.आर. १९७१ आंध्र प्रदेश पान ५३</u> हा अधिनिर्णय सादर केला. वादीतर्फे युक्तिवाद करण्यात आला की, उपरोक्त अधिनिर्णयातील सारांशानुसार दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १५१ नुसार तुर्तातुर्त मनाई आदेशाच्या अंमलबजावणीसाठी पोलीस मदत देता येते.

७. उपरोक्त नमुद अधिनिर्णयातील सारांश मान्य करावा लागतो की, दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १५१ नुसार तुर्तातुर्त मनाई आदेशाच्या अंमलबजावणीसाठी पोलीस मदत देता येते. मात्र वादीतर्फे सादर करण्यात आलेल्या उपरोक्त अधिनिर्णयाची वस्तुस्थिती पाहता त्यामधील वादीला

शेतातील गाळ काढुन नेताना पोलीस मदत देण्यात यावी असा आदेश केलेला दिसतो. सबब अपवादात्मक परिस्थितीमध्ये एखादी गोष्ट पुर्ण करण्यासाठी पोलीस मदत देता येते असे दिसते. मात्र प्रस्तुत प्रकरणी वादीने कोणतेही निश्चित कालावधीमध्ये पुर्ण होणा—या कार्याची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस मदत मागितलेली नसुन संपूर्ण दावामिळकत १अ ते १ई या जवळपास ९हेक्टर जमीनीवरील वादींच्या ताब्यास ज्या ज्या वेळी लागेल त्या त्या वेळी पोलीस मदत मागितलेली आहे. अशा प्रकारे वादीने मागितलेली पोलीस मदत ही अनिश्चित अशा स्वरूपाची आहे आणि याबाबत निश्चित अशी कायमर्यादा देखील देण्यात आलेली नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या अनिश्चित स्वरूपाच्या व कालमर्यादा निश्चित नसलेल्या व तब्बल ९हेक्टर शेतजमीनीवरील ताब्याशी संबंधाने वादींच्या हक्कात पोलीस मदतीचा आदेश करणे न्यायसंगत होणार नाही. त्यामुळे उपरोक्त नमुद अधिनिर्णय प्रस्तुत प्रकरणाच्या वस्तुस्थितीला लागु होत नाही.

८. प्रतिवादींनी वादीच्या दावामिळकत १अ ते १ई वरील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केल्यास वादींना तुर्तातुर्त मनाई आदेशाचा भंग केल्याबाबत प्रतिवादींविरूध्द वेगळी कार्यवाही न्यायालयात दाखल करता येईल. त्यामध्ये उपरोक्त बाब सिध्द झाल्यास प्रतिवादींची जमीन जप्त करण्याबाबत किंवा प्रतिवादींना तुरूंगात टाकण्यात यावे अशी मागणी वादीला करता येईल. तसेच प्रतिवादींनी त्यांच्या उपरोक्त नमुद दावामिळकतीवरील वहिवाटीस हरकत अडथळा केल्यास त्यांना प्रतिवादींविरूध्द संबंधीत पोलीस ठाण्यात योग्य ती कायदेशीर तक्रार करता येईल. मात्र प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता तुर्तातुर्त मनाई आदेशाच्या पालनासाठी पोलीस मदत या टप्प्यावर देता येणार नाही.

त्यामुळेच मी मुद्दा(point) क्र. १ चे उत्तर ''नकारार्थी'' देतो.

**<u>मुददा क्र २ साठी:</u>**

९. मुददा क्र १ चे नकारार्थी उत्तर पाहता मुददा क्र २ चे उत्तर मी अंतिम आदेशाप्रमाणे देतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी ५३ खर्चासह नामंजूर करण्यात आला.

दिनांक: ०५.१०.२०१६

( हे. भा. सिरसाळकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर पंढरपूर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order

a) Name of the Stenographer/Jr. Clerk : A. B. Shaikh

b) Court : C.J.S.D. Court Pandharpur

c) Order signed by P. O. : 05/10/2016

d) Order uploaded on : 06/10/2016.